# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान 2025-26

# (क्षेत्रभेट अहवाल)

- नाव – अमित मोतीराम भोये.
- पद – परिविक्षाधीन गटविकास अधिकारी ( गट – अ)
- क्षेत्रभेटीचे ठिकाण - ग्रामपंचायत कासटवाडी, तालुका जव्हार, जिल्हा पालघर.

## प्रस्तावना

**संयुक्त राष्ट्र संघाने "सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (SDGs)" जाहीर केले आहेत.**
"Leave No One Behind" (सर्वांना सोबत घेऊन चला) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असून त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय आहे. राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. त्या अनुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे.

ग्राम विकास विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. सदर योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करून त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, ग्रामपंचायतीमध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका व सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रांमध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था

गतिमान करणे या संकल्पनेतून “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान” राबविण्याचा शासनाचा विचार आहे.

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रमुख भूमिका बजावणाऱ्या ग्रामपंचायतींना




कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान” हे पुरस्कार अभियान राबविण्यात येत आहे.

# भेटीचा उद्देश-

कासटवाडी ही ग्रामपंचायत जव्हार तालुका व पालघर जिल्ह्यातील डोंगराळ व आदिवासी क्षेत्रात स्थित असून, गावाने मर्यादित संसाधनांमध्येही विकासाची उल्लेखनीय वाटचाल केली आहे. येथे प्रामुख्याने वारली व कोकणा आदिवासी समाज राहतो व त्यांचा मुख्य व्यवसाय शेती, मजुरी व वनउत्पादनावर आधारित आहे. ग्रामपंचायत अंतर्गत वाड्या-पाड्यांमध्ये विखुरलेली वस्ती असूनही प्राथमिक शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे **लोकनियुक्त सरपंच श्री. कल्पेश राऊत व ग्रामविकास अधिकारी श्री. किशोर सोनवणे** यांच्या कार्यक्षम नियोजन व प्रयत्नामुळे तसेच ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागामुळे गावात स्वच्छता, जलसंधारण व विकास कामांमध्ये सकारात्मक बदल दिसून येतो, जे कौतुकास्पद आहे.

या ग्रामपंचायतीस मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत भेट देण्याचा उद्देश म्हणजे ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेणे, GPDP च्या अंमलबजावणीची पडताळणी

करणे, पाणी व्यवस्थापन व जलसंधारण कामे तपासणे, तसेच जलयुक्त शिवार योजना व इतर योजनांची प्रगती पाहणे हा होता. यासोबतच वित्त आयोग निधीचा योग्य वापर, ग्रामसभेतील लोकसहभाग, महिला बचत गट व UMED (MSRLM) अंतर्गत उपजीविका उपक्रमांचे मूल्यांकन करून गावाला शाश्वत विकासाच्या दिशेने नेण्याच्या प्रयत्नांचा अभ्यास करणे हा या भेटीचा मुख्य हेतू होता.

# अभियानाची ग्रामपंचायत स्तरावरील कार्यवाही

१. **अभियानाचा कालावधी :**
मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हा **दि. १७ सप्टेंबर २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६** या कालावधीत राबविण्यात आला.

२. **प्रशिक्षण :**
जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर अभियानासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

३. **ग्रामस्तरावरील प्रशिक्षण :**
ग्रामस्तरावर **दि. ११, १३ व १५ सप्टेंबर २०२५** रोजी प्रशिक्षण घेण्यात आले.

४. **संपर्क अधिकारी नेमणूक :**
अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची **संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक** करण्यात आली.

५. **विशेष ग्रामसभा :**
दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये **विशेष ग्रामसभांचे आयोजन** करण्यात आले. या ग्रामसभेत -

- ग्रामस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली
- विविध विषयांवर लहान गट (Sub-groups) तयार करण्यात आले

---

## गट ग्रामपंचायत कासटवाडी, ता. जव्हार, जि. पालघर

ग्रामपंचायत कासटवाडी येथे **दि. १७ सप्टेंबर २०२५** रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने **राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान** राबविण्याबाबत ग्रामसभेमध्ये विषय मांडण्यात आला.

तसेच -

- ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यात आली
- विविध विषयांनुसार लहान गट तयार करून त्यास मान्यता देण्यात आली

यानंतर ग्रामपंचायतनिहाय **ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करून गावाची मूलभूत माहिती भरण्यात आली.**
तसेच पूर्व प्रश्नावली (Baseline Survey) भरून पूर्ण करण्यात आली.

शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या **आठ घटकांनुसार ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात आले.** त्यामध्ये विशेषतः -

**दि. २ ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.**



## • अभियानाचे प्रमुख घटक (८ Components)

1. सुशासनयुक्त पंचायत - पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
2. सक्षम पंचायत - आर्थिक स्वावलंबन (कर वसुली, CSR)
3. जलसमृद्ध पंचायत - पाणी व्यवस्थापन
4. स्वच्छ व हरित पंचायत - स्वच्छता व पर्यावरण
5. समृद्ध पंचायत (उपजीविका) - रोजगार व SHG
6. सामाजिक न्याय पंचायत - दुर्बल घटकांचा विकास
7. लोकसहभाग पंचायत - ग्रामसभा व जनसहभाग
8. नाविन्यपूर्ण उपक्रम.

## • अभियान काळात राबवण्यात आलेले विविध उपक्रम

**ग्रामपंचायत- ग्रुप ग्रामपंचायत कासटवाडी ,तालुका जव्हार ,जिल्हा पालघर.**

**ग्रामपंचायत एकूण कुटुंब संख्या - २१०१**

**ग्रामपंचायतची एकूण लोकसंख्या- ९३२९**



# १. सुशासनयुक्त पंचायत- पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन

**घटक क्रमांक १- सुशासन युक्त पंचायत**

उपक्रम क्रमांक १- ग्रामपंचायत वेबसाईट - www.grampanchayatkasatwadi.co.in

उपक्रम क्रमांक २ - आपले सरकार सेवा केंद्र दर्जा व सर्व सेवा ऑनलाईन पद्धतीने नागरिकांना सूलभ रित्या देणे व ग्रामपंचायत मध्ये CCTV बसवणे .





**घटक क्रमांक १- सुशासन युक्त पंचायत**

उपक्रम क्रमांक ३ – आयुष्यमान भारत कार्ड व इतर योजना





# २.सक्षम पंचायत - आर्थिक स्वावलंबन (कर वसुली, CSR)





**ग्रामपंचायत कासटवाडी**

ग्रामपंचायत कासटवाडी पैकी गरदवाडी येथे आमदार निधी अंतर्गत बस थांबा बांधणे हे काम करण्यात आले. सन-2025-2026



**ग्रामपंचायत कासटवाडी**

ग्रामपंचायत कासटवाडी पैकी वडापाडा येथे 15 वित्त आयोग अंतर्गत विहिरीलगत संरक्षण भिंत बांधने हे काम करण्यात आले.

सन-2025-2026



**ग्रामपंचायत कासटवाडी**

ग्रामपंचायत कासटवाडी पैकी धुमपाडा येथे15 वित्त आयोग बंधित निधी अंतर्गत गटार बांधणे हे काम करण्यात आले.

सन-2025-2026





**ग्रामपंचायत कासटवाडी**

ग्रामपंचायत कासटवाडी पैकी कातकरी पाडा येथे15 वित्त आयोग बंधित निधी अंतर्गत स्मशानभूमी सिमेंट रोड बांधणे हे काम करण्यात आले.

सन-25-26

ग्रामपंचायत कासटवाडी पैकी जाधवपाडा येथे15 वित्त आयोग बंधित निधी अंतर्गत विहिरीकडे जाणारा सिमेंट रोड बांधणे हे काम करण्यात आले. सन-2025-2026

# ३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित पंचायत

**घटक क्रमांक ३- जल समृद्ध स्वच्छ व हरित गाव**

**उपक्रम क्रमांक १- ग्राम स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबवणे (संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान)**






**घटक क्रमांक ३- जल समृद्ध स्वच्छ व हरित गाव**

**उपक्रम क्रमांक २- वृक्ष लागवड करणे व वृक्ष संवर्धन करणे**






# ४. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण

**घटक क्रमांक ४- मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण**

उपक्रम क्रमांक १ — सांडपाणी व्यवस्थापण व वैयक्तिक शोषखड्डे









**घटक क्रमांक ४- मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण**

उपक्रम क्रमांक २- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल कार्यक्रमासोबत अभिसरण व संवाद





**घटक क्रमांक ४- मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण**

उपक्रम क्रमांक ३- मनरेगा योजनेची प्रभावी अंमलबजावणी व पुनर्भरणाची कामे- फेव्हर ब्लॉक रस्ता व नालासरळीकरण करणे व शेततळे







# ५. गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण






आपले सरकार सेवा केंद्रातून सर्व प्रकारचे दाखले दिले जातात









ग्रामपंचायत कासटवाडी अंतर्गत जाधवपाडा येथे नवीन श्री हनुमान मंदिर बांधकाम करण्यात आले.



ग्रामपंचायत कासटवाडी अंतर्गत गरदवाडी येथे नवीन व्यायामशाळा बांधण्यात आली.

सन-2025




# ६.उपजीविका विकास व सामाजिक न्याय






# ७. लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोक चळवळ निर्माण करणे






# ८. नाविन्यपूर्ण उपक्रम




ग्रामपंचायत कासटवाडी पैकी जाधवपाडा येथिल महिला वर्गाने बांबूपासून विविध वस्तू बनविल्या.



# निष्कर्ष

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामपंचायतींचा सर्वांगीण विकास साधण्यास मोठी मदत होत असल्याचे दिसून येते. कासटवाडी ग्रामपंचायत येथे या अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आली असून **ग्रामस्तरावर लोकनियुक्त सरपंच श्री कल्पेश विनायक राऊत , उपसरपंच श्री त्रिंबक रावते व ग्रामविकास अधिकारी श्री किशोर सोनवणे** यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी अत्यंत प्रभावी व नियोजनबद्ध पद्धतीने केली आहे. ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देणे, ग्रामसभांचे नियमित आयोजन करणे तसेच लोकसहभाग वाढविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

गावातील स्वच्छता, जलव्यवस्थापन व विकासकामांमध्ये त्यांच्या नेतृत्वामुळे सकारात्मक बदल घडून आले आहेत. विशेषतः ग्रामपंचायत प्रशासन पारदर्शक व जबाबदार ठेवण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे कासटवाडी ग्रामपंचायत विकासाच्या दिशेने प्रगती करत असून, इतर ग्रामपंचायतींसाठीही एक आदर्श ठरत आहे.



# ग्रामपंचायत कासटवाडी

ता.जव्हार जि.पालघर



ग्राम पंचायत अधिकारी

श्री.किशोर जुलाल सोनवणे



उपसरपंच

श्री.त्रिंबक सखाराम रावते



लोकनियुक्त सरपंच

श्री.कल्पेश विनायक राऊत






मा.जिल्हाधिकारी पालघर व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. पालघर यांनी कासटवाडी ग्रामपंचायतीस प्रत्यक्ष भेट देऊन विकास कामांची पाहणी केली व मार्गदर्शन केले.

.






# विशेष आभार

ग्रामपंचायत कासटवाडी येथे आयोजित क्षेत्रभेट ही अत्यंत ज्ञानवर्धक व प्रेरणादायी अनुभव ठरली. या यशस्वी क्षेत्रभेटीसाठी मी सर्वप्रथम ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच श्री. कल्पेश विनायक राऊत, ग्रामविकास अधिकारी श्री. किशोर सोनवणे व ग्रामपंचायत सदस्य यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सहकार्यपूर्ण दृष्टिकोनामुळे व कार्यक्षम नियोजनामुळे गावातील विविध विकासकामे, योजना व उपक्रम प्रत्यक्ष पाहण्याची आणि समजून घेण्याची उत्तम संधी मिळाली. त्यांच्या कार्याबद्दल विशेष कौतुक.

तसेच ग्रामस्थांनी दिलेला आत्मीय प्रतिसाद, खुलेपणाने केलेला संवाद व सक्रिय सहभाग याबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे. त्यांच्या अनुभवांमुळे गावाच्या सामाजिक, आर्थिक व विकास प्रक्रियेचे वास्तव व जिवंत चित्र समोर आले, जे या क्षेत्रभेटीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले.

या क्षेत्रभेटीसाठी प्रेरणा देणारे व सतत मार्गदर्शन करणारे माझे वरिष्ठ अधिकारी व मार्गदर्शक श्री दत्तात्रय चित्ते सर (सेवानिवृत्त गटविकास अधिकारी पं. स. जव्हार ) व श्री संदेश दुमाडा सर (सहाय्यक गट विकास अधिकारी पं.स. जव्हार) यांचे मी विशेष आभार मानतो. त्यांच्या प्रशासनिक दृष्टीकोनामुळे, नियोजन कौशल्यामुळे व समन्वयामुळे विविध योजना व विकासकामांची सखोल माहिती प्रभावीपणे समजून घेता आली.

सर्वांच्या अमूल्य सहकार्य, सहभाग व मार्गदर्शनामुळे ही क्षेत्रभेट केवळ अभ्यासापुरती मर्यादित न राहता एक स्मरणीय अनुभव ठरली, याबद्दल मी पुन्हा एकदा सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो🙏 आणि ग्रामपंचायत कासटवाडीस मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासाठी शुभेच्छा. 💐